# नाशिक जिल्हा व अमरावती जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या कृषी योजनांचे चिकित्सक अध्ययन कालखंड २०१४-१५ ते २०१९-२०

**प्रसन्न संजय देशमुख**
*सहाय्यक प्राध्यापक फुलसिंग नाईक महाविद्यालय, पुसद*

**डॉ. अरुण गो. हरणे**
*प्राध्यापक श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय अमरावती*

**सारांश :**
*प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने नाशिक जिल्हा व अमरावती जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या कृषीयोजनांच चिकित्सक अध्ययन २०१४-१५ ते २०१९-२० हा विषय घेऊन सरकारी कृषी योजना लाभार्थ्यांसाठी कितपत उपयुक्त आणि यशस्वी झाली याबाबत लाभार्थ्यांचे मत जाणून घेणे हे त्यांचे उद्दिष्ट होते. अमरावती जिल्हा आणि नाशिक जिल्हा दोन्ही ठिकाणी बहुसंख्य व्यक्तींनी शासकीय कृषी योजनांच्या उपलब्धतेत फरक असल्याचे मानले आहे (अमरावतीमध्ये ३५% आणि नाशिकमध्ये ३७%). यावरून असे दिसून येते की दोन्ही जिल्ह्यांमध्ये शासकीय कृषी योजनांच्या उपलब्धतेसंबंधी काही फरक असू शकतो, ज्यामुळे शेतकऱ्यांना योग्य फायदे मिळविण्यात अडचणी येत आहेत. नाशिक जिल्ह्यात "पूर्णपणे असहमत" व्यक्तींची संख्या अमरावतीच्या तुलनेत जास्त आहे (२६% नाशिकमध्ये आणि २४% अमरावतीमध्ये), यावरून असे दिसते की नाशिकमधील काही लोक शासकीय योजनांच्या उपलब्धतेत कमी फरक मानतात. एकूणच, दोन्ही जिल्ह्यांमध्ये शासकीय योजनांच्या उपलब्धतेत काही फरक असल्याची भावना आहे, परंतु फरकाचे प्रमाण काही प्रमाणात भिन्न आहे.*

## १. प्रस्तावना :

कृषी क्षेत्राचे भारतीय अर्थव्यवस्थेतील महत्त्व लक्षात घेता स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शेती क्षेत्रात गुंतवणुकीस प्रोत्साहन देऊन त्यात वाढ केलेली दिसून येते. कृषी क्षेत्र ही सर्व उद्योगाची जननी आहे. तसेच मानवी पोषक जीवनासाठी, प्रगती तसेच समृद्धीचे प्रतीक समजले जाते. भारतासारख्या कृषी प्रधान अर्थव्यवस्थेत राष्ट्रीय उत्पन्नाचे प्रमुख साधन, रोजगार, औद्योगिक विकास तसेच व्यापाराचे साधन म्हणूनही कृषी कडे पाहिले जाते. कोणतेही राष्ट्राचा आर्थिक विकास साधायचा असेल त्याच प्रथम कृषी व कृषी आधारित उद्योगांचा विकास करावा लागतो. कारण कृषी क्षेत्र हे सर्व उद्योगांचा पाया समजला जातो.

आजच्या काळातही कृषी क्षेत्र जगातील सर्वाधिक लोकसंख्येचे उपजीविकेचे साधन असल्याचे आढळून येते. जगातील सर्व विकसित राष्ट्रांनी प्रथम कृषीचा विकास करून नंतर औद्योगिक विकास केलेला आहे. त्यात रशिया, जर्मनी, इंग्लंड तसेच जपान यांच्या विकासात कृषीचे मोठे योगदान आहे. कृषी क्षेत्राचा सकल राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा जरी कमी असला तरीही शेतीचे आर्थिक विकासातील महत्त्व अनन्यसाधारण आहे. आज सकल राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीचा वाटा 22 टक्के असला तरी शेतीवरील आधारित लोकसंख्येच्या त्या प्रमाणात घट झालेली नाही. आजही 65 टक्के लोकांचे उदरनिर्वाहाचे साधन शेती हे आहे. भारत लोकसंख्येच्या बाबतीत जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे. वाढत्या लोकसंख्येची अन्नधान्याची गरज भागविण्यासाठी व अन्नसुरक्षेसाठी कमी होणारे वहीतीखालील क्षेत्र व पाण्याचा तुटवडा या प्रमुख आव्हानांच्या बाबतीत विचार करायला हवा.

भारताला कृषी क्षेत्र विकासाचा दर गाठण्यासाठी शेती क्षेत्रात उत्पन्न वाढविण्याच्या खूप मोठ्या संधी उपलब्ध आहेत. कृषी प्रक्रिया, पूरक व्यवसाय, प्रक्रिया उद्योगांसाठी अनेक योजना केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्यामार्फत राबविण्यात येत आहे. यावर केंद्र सरकार व राज्य सरकार विविध योजनांच्या मार्फत मोठ्या प्रमाणात निधी खर्च करीत आहेत. सरकारी कृषी योजनांमुळे कृषी क्षेत्रात झालेली प्रगती, योजनांवर लाभ मिळालेले लाभार्थी, उत्पन्नात झालेला बदल, शासनाचे नवनवीन झालेले बदल या संदर्भात विविध लेख व संशोधन करून संशोधकांनी आपले मत मांडले आहे. असे असले तरीही सदर संशोधन कृषी क्षेत्रातील प्रगतीवर भर टाकणारे नक्कीच असणार आहे.

केंद्र तसेच राज्य शासनाकडून शेतीच्या विकासासाठी भरपूर योजना राबविल्या जातात. तसेच मोठ्या प्रमाणात खर्चाची तरतूद ही केली जाते पण प्रत्यक्षात तरतूद केलेला खर्च पूर्ण केला जातो का? या योजनांची शेतकऱ्याला कितपत माहिती आहे. या योजनेचा लाभ प्रत्यक्षात लाभार्थी शेतकऱ्यापर्यंत कितपत होतो. तसेच लाभ घेताना येणाऱ्या अडचणी यांचा सखोल अभ्यास सदर संशोधनात केला जाणार आहे. विषयाची उपरोक्त महत्व लक्षात येता संशोधनासाठी खालील योजना निवडली आहे.

I) जलयुक्त शिवार अभियान
II) सूक्ष्म सिंचन योजना
III) मागेल त्याला शेततळे योजना

**2. संशोधनाची उद्दिष्टे :**

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली.

१. नाशिक जिल्हा व अमरावती जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या सरकारी कृषी योजना लाभार्थ्यांसाठी कितपत उपयुक्त आणि यशस्वी झाली याबाबत लाभार्थ्यांचे मत जाणून घेणे

२. अशा योजनांची उपयोगिता वैशिष्ट्ये जाणून घेणे.

**३. संशोधनाचे गृहीतकृत्ये :**

सदर अध्ययनाची पुढील गृहितके मांडली आहे.

अमरावती जिल्ह्यातील कृषी व कृषकाची सद्यस्थितीतील पार्श्वभूमी लक्षात घेता कृषीविषयक सरकार योजनांची यशस्वीता ही शेतकऱ्यांची आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारण्याबाबत अजून पर्यंत पुरेशा प्रमाणात दृष्टिकोचर आढळत नाही.

**४. संशोधन पद्धती :**

महाराष्ट्र सरकारचे जर्नल्स, इतर प्रकाशने, मासिके इ. हा डेटा होता हे संशोधन वर्णनात्मक अभ्यास आहे. विविध वेबसाइट्सवरून आवश्यक दुय्यम डेटा गोळा केला गेला ज्यात नंतर विश्लेषण आणि निष्कर्षापर्यंत पोहोचण्यासाठी पुनरावलोकन केले गेले.

**जिल्ह्यांतील शासकीय कृषी योजनांच्या उपलब्धतेच्या फरकांबद्दल लाभर्थ्यांची मते**

| वारंवारतानुसार वितरण | | | | |
|---|---|---|---|---|
| | अमरावती | | नाशिक | |
| | वारंवारता | टक्केवारी | वारंवारता | टक्केवारी |
| **पूर्णपणे सहमत** | ३४ | ११ | ३१ | १० |
| **सहमत** | १०४ | ३५ | ११० | ३७ |
| **तटस्थ** | ४७ | १६ | ३८ | १३ |
| **असहमत** | ४२ | १४ | ४३ | १४ |
| **पूर्णपणे असहमत** | ७३ | २४ | ७८ | २६ |
| **एकुण** | ३०० | १०० | ३०० | १०० |




**५. निष्कर्ष :**

वरील तक्त्यात अमरावती आणि नाशिक जिल्ह्यात शासकीय कृषी योजनांच्या उपलब्धतेत फरक असल्याबद्दलच्या प्रतिक्रियांची वारंवारता आणि टक्केवारी दिली आहे. या आकडेवारीचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करता येईलः

**अमरावती जिल्हाः**

पूर्णपणे सहमतः ३४ (११%) व्यक्तींनी शासकीय कृषी योजनांच्या उपलब्धतेत फरक नसल्याबद्दल पूर्णपणे सहमती दर्शवली आहे. याचा अर्थ, काही लोकांना त्यांच्या जिल्ह्यात शासकीय योजनांची उपलब्धता समान किंवा योग्यपणे वाटते.

सहमतः १०४ (३५%) व्यक्ती सहमत आहेत की शासकीय योजनांच्या उपलब्धतेत फरक आहे. यावरून असे दिसते की बहुसंख्य लोक शासकीय योजनांच्या उपलब्धतेबाबत फरक मानतात.

तटस्थः ४७ (१६%) व्यक्ती तटस्थ आहेत, म्हणजेच त्यांना याबद्दल ठराविक मत नाही किंवा त्यांचा अनुभव साधारण आहे.

असहमतः ४२ (१४%) व्यक्ती असहमत आहेत, म्हणजेच त्यांना शासकीय योजनांच्या उपलब्धतेत फरक नाही असा वाटतो.

पूर्णपणे असहमतः ७३ (२४%) व्यक्तींनी शासकीय योजनांच्या उपलब्धतेत फरक नाकारला आहे आणि त्यांना याबद्दल पूर्णपणे असहमत असल्याचे दाखवले आहे.

**नाशिक जिल्हाः**

पूर्णपणे सहमतः ३१ (१०%) व्यक्तींनी शासकीय कृषी योजनांच्या उपलब्धतेत फरक नसल्याबद्दल पूर्णपणे सहमती दर्शवली आहे.

सहमतः ११० (३७%) व्यक्ती सहमत आहेत की शासकीय योजनांच्या उपलब्धतेत फरक आहे. यावरून असे दिसते की नाशिकमध्ये बहुसंख्य लोक शासकीय योजनांच्या उपलब्धतेत फरक मानतात.

तटस्थः ३८ (१३%) व्यक्ती तटस्थ आहेत.

असहमतः ४३ (१४%) व्यक्ती असहमत आहेत, म्हणजेच त्यांना शासकीय योजनांच्या उपलब्धतेत फरक नाही असा वाटतो.

पूर्णपणे असहमतः ७८ (२६%) व्यक्तींनी शासकीय योजनांच्या उपलब्धतेत फरक नाकारला आहे.

**संदर्भ ग्रंथसूची :**

१. रा.णा. घाटोळे समाजशास्त्रातील संशोधन तत्त्वे पद्धती, मंगेश प्रकाशन, नागपूर.

२. कराड बी. एम. (जानेवारी 2007) शास्त्रीय संशोधन पद्धती पिंपळपुरे अँड कोठारी पब्लिकेशन, नवी दिल्ली.

३. प्रतियोगिता दर्पण (आवर्ती 2018) भारतीय अर्थव्यवस्था

४. शिंदे जगन्नाथ (2012-13) अर्थ सहाय्य योजना गोदावरी पब्लिकेशन, नाशिक.

५. विनायक चांदगुडे (जुलै 2017) अद्यावत शासकीय विकास योजना चा खजिना सकाळ पेपर्स प्रा. लिमिटेड